# बृहन्मुंबई महानगरपालिका

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय, खोली क्र. ४६, पहिला मजला,
जुनी इमारत, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र. : ०२२-२२६२०२५१ (३१४५)

एमआयआर / ४८८७ दिनांक : १९.०७.१२

प्रति,
Shri. Parag Bapat
Vera 706, SJR Verity, Kasavanhalli Road,
Off. Sarjapura Road, Near Amritha College,
Bangalore 560035, Karnataka.

विषय : माहितीचा अधिकार अधि. २००५ अन्वये माहिती मिळणेबाबतचा दि. १३.०७.१२ रोजीच्या अर्जाबाबत.

संदर्भ : मचि २७२ दि. १६.०७.१२

आपला संदर्भाधिन माहिती अधिकारांतर्गतचा अर्ज या कार्यालयात दि. १६.०७.१२ रोजी प्राप्त झाला. त्याबाबत आपणांस कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ५(१)/१९(१) अन्वये जनतेला माहिती उपलब्ध करून देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने खातेस्तरावर/विभागस्तरावर जन माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी नियुक्त केलेले आहेत. यास्तव आपल्या अर्जात नमूद केलेल्या मुद्यांबाबतची माहिती खालील नमूद केलेले खाते/विभागातील संबंधीत जनमाहिती अधिकारी देणार असल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ६(३)२ मधील तरतुदीनुसार आपला सदरहू अर्ज आपणांस परस्पर माहिती देण्याच्या विनंतीसह संबंधीत खाते/विभाग यांचेकडे समक्रमांक व दिनांकान्वये अग्रेषित करण्यात येत आहे. त्यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे. आपण त्यांच्याशी संपर्क साधावा हि विनंती.

आपला विश्वासू,
(स्वाक्षरी) १९/७
जन माहिती अधिकारी,
कार्यालय अधिक्षक (~~आयुक्त~~/एमआरसी)

प्रत रवाना :-
कार्यकारी अभियंता (इ. प्र.) पूर्व उप.

यांना अर्जदार Shri. Parag Bapat यांचा उपरोल्लेखित दि. १३.०७.१२ रोजीच्या अर्जातील मुद्यांबाबत आपल्या विभागाशी संबंधीत माहिती अर्जदार परस्पर विहीत मुदतीत देण्यासाठी मूळ अर्ज/मूळ अर्जाची छायांकीत प्रत अग्रेषित करण्यात येत आहे.

सूचना :

उपरोक्त संबंधीत खाते/विभागातील जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येत आहे की जर त्यांच्या विभागाशी उपरोक्त मुद्यांचा माहिती विषयी संबंध येत नसल्यास व अन्य संबंधीत खाते/विभाग यांचेकडे येत असल्यास सदरहू अर्ज पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागाकडे वर्ग करावा व तसे अर्जदारास कळविण्यात यावे. मात्र कोणत्याही परिस्थितीत सदरहू अर्ज आपल्याशी संबंधित नसल्यास आयुक्त कार्यालयास परत अग्रेषित करू नये यांनी संबंधीतांनी कृपया नोंद घेणे ही विनंती.

विभाग/खाते यांचा पत्ता

कार्यकारी अभियंता (इ.प्र.) पूर्व उप. :

राज लेगेसीजवळ, पेपर मिल कंपाऊड, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (प), मुंबई ४०० ०८३.